# NEWS CORNER 2023-24

## SHRIRAM KALA MAHILA MAHAVIDYALAYA,DHAMANGAON RLY

### ORGANIZATION ONE DAY VIDHARABHA MARATHI SAMAJASHTRA PARISAD

# नवभारत

## श्रीराम कला महिला महाविद्यालय में किया गया आयोजन

# आधुनिक महिला आंदोलन पर कार्यशाला

**शैक्षणिक**



■ **धामणगांव रेलवे (सं).** सावित्रीबाई फुले की जयंती के अवसर पर संत गाडगेबाबा अमरावती विश्वविद्यालय अमरावती, श्रीराम कला महिला महाविद्यालय धामणगांव रेलवे, डॉ. आंबेडकर शिक्षण केंद्र संगाबा अमरावती के माध्यम से आधुनिक महिला आंदोलन विषय पर कार्यशाला का आयोजन किया गया. कार्यक्रम की अध्यक्षता महाविद्यालय के प्राचार्य डॉ. नंदकिशोर राऊत ने की. अतिथि के रूप में अधिवक्ता सरोज अवारे तथा मुख्य वक्ता के रूप में डॉ. कुसुमेंद्र सोनटक्के उपस्थित थे. राष्ट्रीय सेवा योजना महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. मोनाली इंगले ने छात्रों को बताया कि आज की महिलाओं के इतनी प्रगति करने के लिए सावित्रीबाई फुले की उपलब्धियां कितनी महत्वपूर्ण हैं. सरोज अवारे ने बताया कि सावित्रीबाई फुले की जीवन यात्रा कितनी कठिन थी. आभार संयोजिका धन्यवाद ज्ञापन टीना सराटे ने माना. उज्वला मेश्राम द्वारा आयोजित कार्यक्रम राष्ट्रीय सेवा योजना एवं सामाजिक विज्ञान विभाग द्वारा आयोजित किये गये. कार्यक्रम को सफल बनाने में प्रोफेसर नितिन बिहाडे, डॉ. राजेश आडे, डॉ. नीता केन, प्रो. सुवर्णा घोपे, डॉ. योगेश काशीकर, भगत, अजय कुलकर्णी, राजकुमार भैया, राजेश मारवे, शरद गवारले, नागोराव पंचबुद्धे, संतोष सिसोदे चव्हाण और प्रफुल्ल कांबले ने प्रयास किए.

Amravati Edition
06-january-2024 Page No. 3
epaper.enavabharat.com

# राष्ट्रीय युवकदिन, जिजाऊ जयंती



धामणगाव रेल्वे : स्थानिक श्रीराम कला महिला महाविद्यालय येथे स्वामी विवेकानंद व राष्ट्रमाता जिजाऊ यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांनी प्रतिमांचे पूजन करून हारअर्पण केले. मान्यवरांनी स्वामी विवेकानंद आणि राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या विचारांवर आधारित विचार प्रकट केले. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभाग तसेच सामाजिक शास्त्र विभागाद्वारे करण्यात आले. याप्रसंगी प्रा नितीन बिहाडे, डॉ.मोनाली इंगळे, अजय कुलकर्णी, राजेश भैय्या, राजेश मारवे, कल्पना वव्हाण, नागोराव पंचबुद्धे आदी उपस्थित होते.

Smart Amravati Edition
Jan 13, 2024 Page No. 4
Powered by : eReleGo.com

आहेत. म्हणून जेष्ठ नागरिकांच्या सम्यक जेष्ठ नागरिक मंडळ

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त एक दिवशीय कार्यशाळा आयोजित



**प्रतिनिधी संतोष वाघमारे /धामणगाव रेल्वे**

श्रीराम कला महिला महाविद्यालय धामणगाव रेल्वे येथे तीन जानेवारी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती च्या वतीने डॉक्टर आंबेडकर अध्यासन केंद्र यांच्यामार्फत कार्यशाळा आयोजित केली होती आधुनिक काळातील स्त्री चळवळ यावर व्याख्यान आयोजित केले होते

कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख होते डॉक्टर सोनटक्के सर आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर राऊत सर व समतादूत सरोज आवारे यांनी फोटोचे पूजन करून हा रात पण केले त्यानंतर पाहुण्यांचे स्वागत करून कार्यक्रमाला सुरुवात झाली कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना महिला कार्यक्रमाधिकारी डॉक्टर मोनाली इंगळे त्यांनी केले आपल्या प्रास्ताविकात त्यांनी कार्यक्रमाची रूपरेषा समजावून सांगितले त्यानंतर प्रमुख होते प्राध्यापक डॉक्टर कुसुमेंद्र सोनटक्के यादव देशमुख कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय तिवसा यांनी स्त्रियांवर अमूल्य असे मार्गदर्शन विद्यार्थिनींना केले याची स्त्री ही इतकी प्रगती करू शकली त्यासाठी सावित्रीबाई फुले यांची कामगिरी किती महत्त्वाची आहे हे विद्यार्थ्यांना आपल्या व्याख्यानातून सांगितले त्याचबरोबर अतिथी म्हणून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग बार्टी अंतर्गत समतादूत सरोज आवारे यांनी सुद्धा सावित्रीबाई फुले यांचा जीवन प्रवास किती खडतर होता हे समजून सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर राऊत सर होते त्यांनी सुद्धा विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. टीना सराटे हिने केले तर आभार प्रदर्शन कु. उज्वला मेश्राम हिने केले कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते तसेच बहुसंख्या विद्यार्थिनी उपस्थित होते कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम या गीताने झाली

# नवभारत

# राम कला महिला कालेज का शैक्षणिक भ्रमण

## विद्यार्थियों का किया गया मार्गदर्शन

■ **धामणगांव रेलवे (सं).** शैक्षणिक वर्ष 2023-24 के लिए स्थानीय राम कला महिला महाविद्यालय का भौगोलिक एवं शैक्षणिक भ्रमण हाल की में आयोजित किया गया. वर्तमान यात्रा का आयोजन माहुरगढ़ एवं कलंब में किया गया. इस यात्रा में बी.ए. सेक्शन 1, 2 और 3 की 27 छात्राएं और 6 स्टाफ सदस्य शामिल थे. वर्तमान यात्रा में सबसे पहले छात्रों ने महाराष्ट्र के साढ़े तीन शक्तिपीठों में से एक माहुरगढ़, रेणुका देवी मंदिर का दौरा किया, जिसके बाद छात्रों ने महत्वपूर्ण माहुरगढ़ किले का दौरा किया. यह किला एक ऊंची पहाड़ी पर बना हुआ है. इसके बाद सभी विद्यार्थियों ने रेणुका माता मंदिर के सामने दत्त शिखर पर स्थित दत्त मंदिर के दर्शन किये तथा अनुसया माता के भी दर्शन किये. इस यात्रा में छात्रों ने ऊंची पहाड़ी श्रृंखला, वनस्पति, जन जीवन, मौसम, मिट्टी, जीव-जंतु, पक्षी आदि का अध्ययन किया. क्षेत्र की भौगोलिक, सामाजिक,



आर्थिक, परिस्थितियों का अध्ययन किया. प्रत्येक वर्ष अध्ययन यात्रा का आयोजन किया जाता है जो अनिवार्य है. भूगोल विभाग प्रत्येक वर्ष इस यात्रा को सफलतापूर्वक आयोजित करने के लिए कार्य कर रहा है. अभिजीत डोड राजनीति विज्ञान विभाग के अध्यक्ष प्रो. नितिन बिहाडे, डा. राजेश आडे, प्रोफेसर मिलिंद उवाडे, प्रोफेसर दादाराव ओइके गैर शिक्षण स्टाफ श्री राजेश मार्वे और दीक्ष कतलम, समीक्षा कुंजेकर, सैली गणवीर निकिता खेकड़े, प्रीति दंबाले, अस्मित तेलंगे, शिवानी पंधारे, कशिश करं स्वीटी वानखड़े, रुतिका निखार वैष्णवं नीचत , स्वाति यादव सहित अधिकांश छात्र छात्राएं उपस्थित रहे.

Amravati Edition
23-february-2024 Page No. 3
epaper.enavabharat.com

हिंदुस्थान

# आधुनिक काळातील स्त्री चळवळ कार्यशाळा संपन्न

## श्रीराम कला महिला महाविद्यालय धामणगाव रेल्वेचे आयोजन



धामणगाव रेल्वे दि. ४ : सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती , श्रीराम कला महिला महाविद्यालय धामणगाव रेल्वे , डॉ आंबेडकर अध्यासन केंद्र संगाबा अमरावती यांच्यामार्फत कार्यशाळा आयोजित केली होती. आधुनिक काळातील स्त्री चळवळ या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबा व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राऊत सर यांनी फोटोचे पूजन केले. त्यानंतर पाहुण्यांचे स्वागत करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नंदकिशोर राऊत तर एडवोकेट सरोज आवारे अतिथी म्हणून व डॉ कुसुमेंद्र सोनटक्के प्रमुख वक्ते म्हणून मंचावर उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना महिला कार्यक्रमाधिकारी डॉ मोनाली इंगळे त्यांनी केले आपल्या प्रास्ताविकात त्यांनी कार्यक्रमाची रूपरेषा समजावून सांगितले प्राध्यापक डॉ कुसुमेंद्र सोनटक्के यांनी स्त्रियांवर अमूल्य असे मार्गदर्शन विद्यार्थिनींना केले आजची स्त्री ही इतकी प्रगती करू शकली त्यासाठी सावित्रीबाई फुले यांची कामगिरी किती महत्त्वाची आहे हे विद्यार्थ्यांना आपल्या व्याख्यानातून सांगितले. त्याचबरोबर अतिथी म्हणून सरोज आवारे यांनी सुद्धा सावित्रीबाई फुले यांचा जीवन प्रवास किती खडतर होता हे समजून सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. टीना सराटे हिने केले तर आभार प्रदर्शन कु. उज्वला मेश्राम हिने केले कार्यक्रमांचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना व सामाजिक शास्त्र विभाग कदून करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी ते करिता प्राध्यापक नितीन बिहाडे डॉ.राजेश आडे डॉ निता केने यांनी प्रयत्न केले कार्यक्रमाला प्राध्यापक सुवर्ण घोपे डॉ योगेश काशीकर भगत मॅडम अजय कुलकर्णी राजकुमार भैया राजेश मा र वे शरद गवारले नागोराव पंचबुद्धे संतोष सिसोदे चव्हाण आणि प्रफुल कांबळे संपूर्ण महाविद्यालय कर्मचारी व बहुसंख्या विद्यार्थिनी उपस्थित होत्या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम या गीताने झाली.

# स्व. आर. जी. देशमुख कृषी महाविद्यालयात युवकदिन



तिवसा : स्व. आर. जी. देशमुख कृषी महाविद्यालय तिवसा व राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत स्वामी विवेकानंद जयंती व राजमाता जिजाऊ जन्मोत्सवानिमित्त शहरात विविध ठीकाणी मिरवणूक व व्यसनमुक्ती, एड्स पथनाटयाव्दारे जनजागृती करण्यात आली. प्रियंका देशमूख यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य डॉ. एस. व्ही. बोंडे तसेच प्रा. ए. बी. डहाके, प्रा. एम लुंगे, प्रा. एस. साबळे, प्रा. एस जी राठी, प्रा. एस. शिरपूरकर प्रा. यु. तिवसकर प्रा. डी. गायकवाड, प्रा. ए. कोकाटे, प्रा. पी. वरखडे, प्रा. गायकवाड, एस. एस. उमप, पी. व्ही केने, एस. लाजुरकर, एस. एम. कुबडे, आर के. धुरडे एम. काळकर, एस. हरणे उपस्थित होते.

# राष्ट्रीय युवकदिन, जिजाऊ जयंती



धामणगाव रेल्वे : स्थानिक श्रीराम कला महिला महाविद्यालय येथे स्वामी विवेकानंद व राष्ट्रमाता जिजाऊ यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांनी प्रतिमांचे पूजन करून हारअर्पण केले. मान्यवरांनी स्वामी विवेकानंद आणि राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या विचारांवर आधारित विचार प्रकट केले. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभाग तसेच सामाजिक शास्त्र विभागाद्वारे करण्यात आले. याप्रसंगी प्रा नितीन बिहाडे, डॉ. मोनाली इंगळे, अजय कुलकर्णी, राजेश भैय्या, राजेश मारवे, कल्पना वव्हाण, नागोराव पंचबुद्धे आदी उपस्थित होते.

Smart Amravati Edition
Jan 13, 2024 Page No. 4
Powered by : eReleGo.com

पुण्य नगरी

# श्रीराम कला महिला महाविद्यालयाची शैक्षणिक सहल



**धामणगाव रेल्वे :** स्थानिक श्रीराम कला महिला महाविद्यालयाची भौगोलिक व शैक्षणिक सहल श्रीक्षेत्र माहूरगड व कळंब येथे नेण्यात आली होती. या सहलीमध्ये बी.ए.चे २७ विद्यार्थी व ६ कर्मचाऱ्यांचा सहभाग होता. सहलीदरम्यान सर्वप्रथम श्रीक्षेत्र माहूरगड येथील प्रसिद्ध रेणुकादेवी मंदिरामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी एक श्री.रेणुका मातेचे दर्शन घेतले. यानंतर येथील माहुरगड किल्ल्यावर विद्यार्थ्यांनी दुर्गदर्शन व भ्रमंती केली. माहूरगड येथील हा किल्ला १२ व्या शतकातला असून त्याला भक्कम भिंत व मजबूत असे बुरुज लाभलेले आहेत. हा किल्ला रेणुका मातेच्या मंदिरासमोरील उंच टेकडीवर बांधलेला आहे. यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी श्री दत्त शिखर येथे दत्त मंदिराचे व अनुसया माता, कळंब येथील श्री चिंतामणी गणपती मंदिरचे दर्शन घेतले. या सहलीमध्ये विद्यार्थ्यांनी उंच टेकडी डोंगररांगा यांच्या अध्ययनाबरोबरच येथील वनस्पती, लोकजीवन, हवामान, मृदा, पशुपक्षी, प्राणी यांचेही सूक्ष्म निरीक्षण केले. सहलीचे नियोजनात प्राचार्य डॉ. नंदकिशोर राऊत, भूगोल विभाग प्रमुख प्रा. अभिजीत दोड, राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. नितीन बिहाडे, डॉ. राजेश आडे, प्रा.मिलींद उभाडे, प्रा. दादाराव उईके शिक्षकेतर कर्मचारी राजेश मारवे, दीक्षा कातलाम, समीक्षा कुंजेकार, सायली गणवीर , निकीता खेकडे, प्रीती डंबाळे, अस्मिता तेलंगे, शिवानी पंधरे, कशिष करसे, स्वीटी वानखडे, रूतिका निखर, वैष्णवी नीचत, स्वाती यादव यांनी केले होते.

Smart Amravati Edition
Feb 22, 2024 Page No. 3
Powered by : eReleGo.com

पुण्य नगरी

# श्रीराम कला महिला महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिवस

**पुण्य नगरी** / तालुका प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे :** स्थानिक श्रीराम कला महिला महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाद्वारे राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला. यावेळी नमो नव मतदार हा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा कार्यक्रम लाईव्ह विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला.



त्यानंतर राष्ट्रीय मतदारदिनानिमित्त उद्बोधनाचा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. नंदकिशोर राऊत, वक्ते म्हणून रावसाहेब रोठे, वैभव देशमुख, राकेश मिश्रा निवृत्ती लोखंडे मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबा आणि भारत माता यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. त्यानंतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन डॉ. राजेश आडे तर आभार प्रदर्शन प्रा. अभिजित दोड यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता नितीन बिहाडे, कशिश करशे, निधी खडसे, स्वीटी वानखडे, निशा शेंडे, भाग्यश्री थोरात यांनी सहकार्य केले.

कार्यक्रमाला डॉ. सुधीर पाथरे, डॉ. निता केने, डॉ. मोनाली इंगळे, डॉ. योगेश काशीकर, अजय कुलकर्णी, राजकुमार भय्या, राजेश मारवे, नागोराव पंचवबुद्धे, शरद गवारले, प्रफुल कांबळे, कल्पना चव्हाण आदी उपस्थित होते.

Smart Amravati Edition
Jan 31, 2024 Page No. 3
Powered by : eReleGo.com

पुण्य नगरी

# श्रीराम कला महिला महाविद्यालय, धामणगाव रेल्वे



**धामणगाव रेल्वे :** सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, श्रीराम कला महिला महाविद्यालय, डॉ आंबेडकर अध्यासन केंद्र संगाबा अमरावती यांच्यामार्फत आधुनिक काळातील स्त्री चळवळ या विषयावर कार्यशाळा पार पडली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नंदकिशोर राऊत, अतिथी म्हणून सरोज आवारे, डॉ कुसुम सोनटक्के मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना महिला कार्यक्रमाधिकारी डॉ मोनाली इंगळे त्यांनी केले. प्रा. डॉ कुसुमेंद्र सोनटक्के यांनी स्त्रियांवर विद्यार्थिनींना मादर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन टीना सराटे हिने केले तर आभार प्रदर्शन उज्वला मेश्राम हिने केले. कार्यक्रमांचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना व सामाजिकशास्त्र विभागाकडुन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता प्रा. नितीन बिहाड. डॉ.राजेश आड. डॉ नित केने यांनी परिश्रम घेतले. यावेळी प्रा सुवर्णा घोपे, अजय कुलकर्णी, राजकुमार भैया, राजेश मारवे, शरद गवारले, नागोराव पंचबुद्धे, संतोष सिसोदे, चव्हाण, प्रफुल कांबळे उपस्थित होते.

Smart Amravati Edition
Jan 8, 2024 Page No. 3
Powered by : eReleGo.com

पुण्य नगरी

# श्रीराम कला महिला महाविद्यालयात स्वच्छता अभियान



धामणगाव रेल्वे : स्थानिक श्रीराम कला महिला महाविद्यालयात संत गाडगेबाबा यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. त्यानिमित्त स्वच्छता अभियान राबविण्यात आले. सर्वप्रथम प्राचार्य डॉ. नंदकिशोर राऊत यांनी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर स्वच्छता अभियान राबविण्यात आले. त्या अंतर्गत महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करण्यात आला. त्यानंतर गाडगेबाबा यांच्या विचारांवर आधारित विचार मंथन कार्यक्रम घेण्यात आला. त्यात विद्यार्थिनी व मान्यवरांनी विचार व्यक्त केले.

Smart Amravati Edition
Feb 26, 2024 Page No. 3
Powered by : eReleGo.com

# श्रीराम महिला महाविद्यालयात डॉ. पंजाबराव देशमुख यांची जयंती

**पुण्य नगरी** / तालुका प्रतिनिधी




**धामणगाव रेल्वे :** श्रीराम कला महिला महाविद्यालयात डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

प्रमुख वक्ते म्हणून महाविद्यालयाचे इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. डॉ. आडे यांनी भाऊसाहेबांचा जीवन प्रवास उलगडून दाखविला. त्याचबरोबर प्रा. सुवर्णा घोपे यांनी भाऊसाहेबांच्या शैक्षणिक प्रवासाबद्दल विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. मोनाली इंगळे उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे संचालन वैष्णवी मोहोड व आभार प्रदर्शन प्रियंका सम्रत यांनी केले.

कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या. जयंतीनिमित्त महाविद्यालयामध्ये रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

त्यामध्ये विद्यार्थिनींनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कार्यावर आधारित रांगोळी काढल्या. निबंध स्पर्धेचे आयोजनदेखील करण्यात आले होते.

# विदर्भ मराठी समाजशास्त्र परिषद उत्साहात संपन्न



धामणगाव रेल्वे दि. १४ : स्थानिक श्रीराम शिक्षण संस्था द्वारा संचालित श्रीराम कला महिला महाविद्यालय येथे विदर्भ मराठी समाजशास्त्र परिषदेचे २४ वे अधिवेशन महाविद्यालयामध्ये संपन्न झाली. या परिषदेमध्ये विदर्भातील नामवंत समाज शास्त्र अभ्यासक शास्त्रज्ञ उपस्थित होते. या परिषदेचा विषय विदर्भातील ग्रामीण समाज समस्या व आव्हाने हा असून विदर्भातील ग्रामीण समाजाच्या समस्यांवर चर्चा अभ्यास या परिषदेच्या माध्यमातून करण्यात आली.

परिषदेचे उद्घाटक म्हणून सुभाषराव देशमुख या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून घनश्याम मेश्राम उपस्थित होते. या परिषदेचे प्रास्ताविक डॉक्टर नंदकिशोर राऊत यांनी केले तर अधिवेशनाचे बीज भाषण म्हणून डॉक्टर जगन कराडे यांनी विचार व्यक्त केले प्रमुख अतिथी म्हणून डॉक्टर बी एम कऱ्हाडे माननीय डॉक्टर किशोर राऊत मंचावर उपस्थित होते. यावेळी सर्व मान्यवरांचे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर या परिषदे करिता विविध समाज संशोधकांनी आपले विचार साहित्यद्वारे मांडले होते. त्या सर्व विचारांचे संशोधन पत्रिकेच प्रकाशन यावेळी करण्यात आले. त्यानंतर प्रथम सत्र मध्ये अध्यक्ष म्हणून डॉ. प्रदीप मेश्राम वक्ते डॉ. अशोक बोरकर उपस्थित होते यावेळी यावेळी ग्रामीण समाजामधील समस्या यांच्यावर मोठ्या प्रमाणात चर्चा करण्यात येऊन समस्यांची मांडणी आणि त्यावर उपाय सुचविण्यात आले.

दुसऱ्या सत्रामध्ये सत्राचे अध्यक्ष म्हणून डॉक्टर म्हणून डॉ. दया पांडे उपस्थित होत्या या १७ मध्ये ग्रामीण समाजातील शेतकऱ्यांची स्थिती त्यांच्या समस्या यावर चर्चा करण्यात आली.

भोजन अवकाश यानंतर दुपारी तिसरा सत्राला सुरुवात झाली या सत्राचे अध्यक्ष म्हणून डॉ. किशोर राऊत अमरावती विद्यापीठ अमरावती तर वक्ते म्हणून डॉ. श्याम खंडारे गडचिरोली उपस्थित होते .यावेळी समाजशास्त्रज्ञांनी ग्रामीण समस्यांवर कशाप्रकारे संशोधन केले पाहिजे यावर विचारमंथन झाले. संपूर्ण परिषदेला महाराष्ट्र मधून चांगला प्रतिसाद मिळाला असून १०० पेक्षा जास्त समाजशास्त्रज्ञ यावेळी परिषदेला उपस्थित होते. त्यानंतर समारोपीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सुभाषराव देशमुख संचालक श्रीराम शिक्षण संस्था तर अतिथी म्हणून डॉ बी एम कऱ्हाडे, विलास कडू , किशोर साकुरे, प्रमोद मुंधडा उपस्थित होते. यावेळी डॉक्टर नंदकिशोर राऊत यांनी परिषदेचा अहवाल वाचून दाखविला उत्कृष्ट पद्धतीने परिषदेचे आयोजन केल्याबद्दल आयोजकांनी आभार व्यक्त केले तर अध्यक्षांनी प्रथमच आपल्या महाविद्यालयामध्ये अशा प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन झाले असल्यामुळे अशा प्रकारच्या कार्यक्रमाचे आणखी आयोजन करावे असे सूचना केल्या. यावेळी संस्थेचे अध्यक्ष अरुण अडसड आणि आमदार प्रताप अडसड यांनी या परिषदेला शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे संचालक प्राध्यापिका सुवर्ण घोपें तर आभार प्रदर्शन डॉ. राजेश आडे प्राध्यापक अभिजीत दोड यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी ते करिता प्राध्यापक नितीन बिहाडे डॉक्टर सुधीर पात्रे डॉक्टर मोनाली इंगळे डॉक्टर नीता केणे यांनी प्रयत्न केले. याकरिता महाविद्यालयाचे सर्व कर्मचारी यामध्ये अजय कुलकर्णी राजकुमार भैय्या, राजेश मारवे, संतोष शिसोदे, नागोराव पंचबुद्धे, शरद गवारले, कल्पनाताई चव्हाण,प्रफुल्ल कांबळे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला प्राध्यापक उबाळे, प्राध्यापक दादाराव उईके, प्राध्यापिका मोनाली भगत आणि बहुसंख्य विद्यार्थिनी यावेळी उपस्थित होत्या.